# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## विशेष फेरी-४ प्रसिध्दी निवेदन

दि.०१.०९.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता १० वी पुरवणी परीक्षा जुलै-२०१६ चा निकाल जाहिर झाला आहे. सदर परीक्षेतील उत्तीर्ण व एटीकेटी प्राप्त विद्यार्थ्यासह प्रवेशाची विशेष फेरी-४ होणार असून फेरीचे वेळापत्रक व महत्त्वाच्या सूचना पुढील प्रमाणे.

**विशेष फेरी-४ विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | विशेष फेरी-४ साठी रिक्त जागांचा तपशिल जाहिर करणे. | दि.०३.०९.२०१६ सकाळी ११.०० वाजता |
| २ | नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड विक्री (या फेरीत समाविष्ट होणा-या सर्व विद्यार्थ्यांसाठी) | दि ०६, ०७, व ०८ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० ते सायं.४.०० वाजेपर्यंत |
| ३ | प्रवेश अर्ज भरणे | दि.०६, ०७, व ०८, सप्टेंबर २०१६ (दि. ६ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० वाजलेपासून) |
| ४ | प्रवेश अर्ज भाग-१ अॅप्रुव्हल (सर्व पुर्नपरिक्षार्थी विद्यार्थ्यांना आवश्यक) | दि. ०६, ०७, ०८ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत |
| ५ | प्रवेश अर्ज भाग-१ अॅप्रुव्हल केल्यानंतर भाग-२ (पसंतीक्रम) भरणे. | दि. ०६, ०७, ०८ सप्टेंबर २०१६ (दि.६ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० पासून ते दि.०८ सप्टेंबर सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) |
| ६ | गुणवत्ता यादी जाहिर करणे. | दि. १० सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० वाजता |
| ७ | गुणवत्ता यादी प्रमाणे प्रवेश | दि.१० सप्टेंबर २०१६ व १३ सप्टेंबर २०१६ (सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत) |

**विशेष फेरी-४ मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-**

१) विशेष फेरी-४ मध्ये समाविष्ट होवु इच्छिणा-या प्रत्येक विद्यार्थ्यास नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड घ्यावा लागेल.

अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ.१० वी पुरवणी परीक्षा जुलै २०१६ या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच एटीकेटी पात्र विद्यार्थ्यांनी नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड टाकुन लॉग-इन करावे, व जुलै २०१६ या परीक्षेचा बैठक क्रमांक टाकुन पुर्नपरीक्षार्थी (Repeater) म्हणून नव्याने प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरावा.

ब) यापुर्वी प्रवेश प्रक्रियेत असलेल्या विद्यार्थ्यांनी लॉग-इन करतांना त्यांचा जुना लॉग-इन आयडी व पासवर्ड टाकावा, त्यानंतर सिस्टीम नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड विचारेल, तो टाकल्यानंतर जुना लॉग-इन आयडी अॅक्टीवेट होईल व त्या लॉग-इन आयडी मधुनच प्रवेश अर्जाचा भाग-२ (पसंतीक्रम) भरता येईल.

क) अद्याप पर्यंत प्रवेश अर्ज न भरलेल्या व जुलै २०१६ किंवा त्यापुर्वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी नवीन लॉग-इन आयडी घेवुन प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरावा.

२) माहिती पुस्तिकेत कनिष्ठ महाविद्यालयांचे शाखा व माध्यम निहाय कॉलेज कोड नंबर दिलेले आहेत. यावर्षी नव्याने मान्यता मिळालेले कनिष्ठ महाविद्यालये व तुकडयांची माहिती प्रवेशाच्या संकेतस्थळावर होमपेजवर उपलब्ध आहेत, या माहितीचा विचार करुन रिक्त जागांनुसार पसंतीक्रम भरावेत.

३) सदर फेरीतील प्रवेश रिक्त जागांवर होणार असुन कॉलेज कोड निहाय रिक्त जागांचा तपशिल प्रवेशाच्या संकेतस्थळाच्या होमपेजवर (Vacancy for Special Round-4) उपलब्ध असेल.

४) विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरतांना रिक्त जागा, संकेतस्थळावर उपलब्ध असलेले २०१६-१७ चे कटऑफ व स्वतःचे गुण यांचा विचार करुन पसंतीक्रम भरावेत. विद्यार्थ्यांनी किमान १० व कमाल १५ पसंतीक्रम भरावेत.

५) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ.१० वी च्या परीक्षेत श्रेणी विषयासह एक किंवा दोन विषयात अनुत्तीर्ण असलेले विद्यार्थीच एटीकेटी अंतर्गत प्रवेशास पात्र असतील. सदर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जात त्यांचे एकुण ६०० पैकी प्राप्त गुण नोंदविणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांनी बेस्ट फाईव्ह चे गुण न नोंदविता प्रवेश अर्जात दोन्ही ठिकाणी एकुण ६०० पैकी प्राप्त गुणांची नोंद करणे आवश्यक आहे.

६) एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी लॉग-इन आयडी ची वेगळी मालिका (सिरीज) असेल त्याच लॉग-इन आयडी घेवुन विद्यार्थ्याने अर्ज भरणे आवश्यक आहे.

७) विशेष फेरी-४ मध्ये सहभागी होणा-या सर्व विद्यार्थ्यांना नवीन लॉग-इन आयडी व पासवर्ड घेणे आवश्यक आहे. रुपये १००/- (शंभर) शुल्क देवुन खालील केंद्रावरुन खालील केंद्रावरुन विद्यार्थ्यांनी लॉग-इन आयडी व पासवर्ड घ्यावा. नवीन लॉग-इन आयडी घेतांना विद्यार्थ्याने जुलै-२०१६ परीक्षा ऑनलाईन निकालाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचा प्रकार | लॉग-इन आयडी पासवर्ड मिळण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | उत्तीर्ण विद्यार्थी | पुणे शहरासाठी<br>एचएससीपी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (हुजुरपागा) , लक्ष्मी रोड पुणे-<br>------------------------------------------------------------<br>पिंपरी चिंचवड शहरासाठी<br>नवमहाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपरी वाघिरे पुणे-१७. |
| २ | एटीकेटी विद्यार्थी | एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर, पुणे |
| ३ | दि. ०६, ०७, व ०८ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत | |

७) वर नमुद वेळापत्रकाप्रमाणे दि. ०६ ते ०८ सप्टेंबर२०१६ या कालावधीत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ पुर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेत यापुर्वीच्या फे-यांमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग-२ (पसंतीक्रम) भरावा.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इ.१० वी पुरवणी परीक्षा जुलै-२०१६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या तसेच एटीकेटी पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जात रिपीटर /एटीकेटी हा पर्याय निवडावा. यासर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाच्या भाग-१ साठी ॲप्रुव्हल घेणे आवश्यक आहे. ॲप्रुव्हलसाठी यापुर्वीच्या

परिक्षांच्या मुळ गुण पत्रिका व जुलै २०१६ परीक्षेच्या ऑनलाईन निकालाच्या गुणपत्रिकेची स्वंय साक्षांकित प्रत सोबत असणे आवश्यक आहे. तसेच जन्म तारखेचा उल्लेख असलेले विद्यार्थ्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे बोनाफाईड सर्टिफिकेट आवश्यक आहे. विद्यार्थ्यांने प्रवेश अर्जात आरक्षण नमुद केलेले असल्यास त्याच्या ॲप्रुव्हलसाठी माहिती पुस्तिकेत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जात वैधानिक आरक्षण नमुद केलेल्या विद्यार्थ्याकडे जातीचा मुळ दाखला किंवा शाळा सोडल्याचा मुळ दाखला नसल्यास अशा विद्यार्थ्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे जातीचा उल्लेख असलेले बोनाफाईड सर्टिफिकेट आवश्यक आहे.

ॲप्रुव्हल मिळण्यासाठीचे केंद्र खालील प्रमाणे

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचा प्रकार | ॲप्रुव्हलसाठीचे केंद्र |
|---|---|---|
| १ | उत्तीर्ण विद्यार्थी | पुणे शहरासाठी<br>१) सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड पुणे.<br>२) मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे<br>पिंपरी चिंचवड शहरासाठी<br>श्री.म्हाळसाकांत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आकुर्डी पुणे-३५ |
| २ | एटीकेटी विद्यार्थी | १)आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वे रोड पुणे-४<br>२) साधना कनिष्ठ महाविद्यालय, हडपसर पुणे<br>३) नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे<br>४) जयहिंद कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरी वाघिरे पुणे-१७. |
| ३ | दि. ०६, ०७, व ०८ सप्टेंबर २०१६ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत | |

ॲप्रुव्हल आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भाग-१ ला ॲप्रुव्हल घेतल्यानंतरच भाग-२ (पसंतीक्रम) भरता येईल व असेच विद्यार्थी विशेष फेरी-४ साठी पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१